# जाहीर नोटीस

## जिगांव प्रकल्प

ता. नांदुरा                                                    जि. बुलडाणा

जिगांव प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्र. ९ टप्पा क्र. ३ अ चे वितरण कुंड व पंपगृहाच्या बांधकामाकरीता मौजे घाटपुरी ता. खामगांव जि. बुलडाणा येथील संपादीत करण्यात येत असलेल्या खाजगी जमिनीची सरळ खरेदी करण्याबाबत पुर्वसुचना.

ज्या अर्थी कार्यकारी अभियंता, जिगांव उपसा सिंचन विभाग, खामगांव जि.बुलडाणा ह्यांचे वतीने सहाय्यक अभियंता श्रेणी १, जिगांव उपसा सिंचन उपविभाग क्र.३ खामगांव जि.बुलडाणा जाहीर नोटीस प्रसिध्दीस देतात की,

खामगांव तालुक्यातील मौजे घाटपुरी या गावातील खाली प्रसिध्दीस दिलेल्या यादीतील जमीन धारकांना/मालकांना व नमुद केलेल्या शेत जमिनीशी ज्यांचा हितसंबंध आहे, अशा जमिन मालकांच्या शेतजमिनी/सरळ खरेदी-विक्री व्यवहाराने खाजगी जमीनीची खरेदी करण्याबाबत आक्षेप वजा हरकती असल्यास तसेच ज्यामध्ये सर्व बँक, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, वारस व इतर संबंधीत आदींचा समावेश आहे असे अधिकार अभिलेखावरुन दिसून येईल अशा सर्व व्यक्तींना ही जाहीर नोटीस प्रसिध्द दिनांकापासून १४ दिवसाचे आत लेखी स्वरुपात आवश्यक त्या दस्तऐवजासह कार्यालयीन वेळेत सहाय्यक अभियंता श्रेणी १, जिगांव उपसा सिंचन उपविभाग क्र.३, जनुना, अकोला रोड,खामगांव जि.बुलडाणा (भ्रमणध्वनी क्र. ८०८७३४८८९१) येथे आक्षेप व हरकती असल्यास दाखल करावयात. सदर कालावधी नंतर येणाऱ्या आक्षेप / हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरील जमिनीची सरळ खरेदी व्यवहार केल्या जाईल ह्याची नोंद घ्यावी. सोबत जमीन मालकांची त्यांचे ७/१२ नुसार गट / सर्व्हे नंबर निहाय खरेदी करावयाच्या क्षेत्रासह माहिती प्रसिध्दीस खाली दिली आहे.

| अ. क्र. | मौजा व तालुका | कास्तकाराचे नांव ( सर्वश्री ) | गट क्रमांक | ७/१२ नुसार क्षेत्र हे. आर | संपादन करावयाचे क्षेत्र हे. आर. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | घाटपुरी ता. खामगांव | निकीता दिनकर शेळके व इतर | ६६/३ | १.७४ | ०.८० | |

दिनांक - १६/०८/२०२४

स्वा -
( ब्र.श्री.गावंडे)
सहाय्यक अभियंता श्रेणी १
जिगांव उपसा सिंचन उपविभाग क्र.३
खामगांव

तयार करणार
स्वा -
ॲड श्री. जयंत खरासने ,खामगांव

D:\Office Work\Sub Division Shriram\JMR Report\Notice in Paper Baggare\Jahir Notis 2011